अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावर
पदोन्नतीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन आदेश क्रमांकः एसएलएस-१२१६/(३९०/२०१६)/भाग-१/आ.(वर्ग-१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

तारीख: ०९ ऑक्टोबर, २०१७.

वाचा:- सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.ईएसबी-१११७/प्र.क्र.२७/१३, दि.१२.०५.२०१७.

शासन आदेश :-

जलसंपदा विभागातील खालील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावर रुपये १५६००-३९१०० + श्रेणीवेतन (Grade pay) रु.७६००/- या वेतनश्रेणीत संदर्भीय दि.१२.०५.२०१६ च्या पत्रान्वये आस्थापना मंडळाने शिफारस केल्यानुसार **तदर्थ स्वरुपात** पदोन्नती देण्यात येत आहे.

१. श्री.रविकुमार गजानन पराते (खुला) (ज्ये.क्र.२८)

२. श्री.मिलिंद वसंतराव कुलकर्णी (खुला) (ज्ये.क्र.४७)

३. श्री.ज्ञानदेव आनंदा बागडे (अ.जा.) (ज्ये.क्र.६०)

४. श्री.प्रभाकर धोंडूजी हेडाऊ (अ.ज.) (ज्ये.क्र.६१)

५. श्री. धिरज बाळकृष्ण साळे (अ.जा.) (ज्ये.क्र.६७)

२. वर नमूद अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून तदर्थ / तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे :-

१) सदर पदोन्नती ही तदर्थ व मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२७९७/२०१५ (स्टॅम्प क्र.७२५६/२०१५) (महाराष्ट्र राज्य विरुध्द श्री.विजय घोगरे व इतर) तसेच संलग्न इतर न्यायालयीन प्रकरणामध्ये झालेल्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

२) सदर पदोन्नत्या ज्येष्ठतासूचीसंदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे श्री.र.दौ.वर्धने व इतर ८ यांनी मूळ अर्ज क्र.१०७८/२०१६, श्री.सु.ब.चव्हाण व इतर २० यांनी मूळ अर्ज क्र.७११/२०१४ व श्री.सं.दि.डोंणगावकर यांनी मूळ अर्ज क्र.११०१/२०१५ अन्वये दाखल केलेल्या याचिकावरील होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

३) सदर पदोन्नती महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ व वर्ग-२ (ज्येष्ठता विनियम व ज्येष्ठता यादीची सुधारणा) नियम, १९८३ अन्वये वेळोवेळी सुधारित होणाऱ्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाच्या ज्येष्ठतेच्या अधीन राहील.

४) सदर अधिकाऱ्यांना देण्यात आलेली ही पदोन्नती कोणतीही पूर्वसूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

३. पदोन्नत झालेल्या वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नियुक्ती सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने खालीलप्रमाणे करण्यात येत आहे:-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव सर्वश्री.	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	रविकुमार गजानन पराते	उप अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, अंबाडी, भंडारा.	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	रिक्त पदी.
२.	मिलिंद वसंतराव कुलकर्णी	कार्यकारी अभियंता, माजलगाव कालवा विभाग क्र.७, गंगाखेड (परभणी).	अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बीड (बांधकाम).	रिक्त पदी.
३.	ज्ञानदेव आनंदा बागडे	कार्यकारी अभियंता, कोयना सिंचन विभाग, कोयनानगर.	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	रिक्त पदी.
४.	प्रभाकर धोंडूजी हेडाऊ	कार्यकारी अभियंता, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.	सहआयुक्त (अधीक्षक अभियंता), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र, नागपूर.	रिक्त पदी.
५.	धिरज बाळकृष्ण साळे	कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग, रत्नागिरी (सिंचन).	अधीक्षक अभियंता (धरण), संकल्पचित्र मंडळ, म.सं.सं., नाशिक.	रिक्त पदी.

४. वरील पदोन्नत अधिकारी हे नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत अवगत करावे.

५. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्याने अधीक्षक अभियंता या पदाचा कार्यभार ग्रहण केल्यावर वेतननिश्चितीचा विकल्प तात्काळ द्यावा. असा विकल्प न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक ११(१)(ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन, करण्यात यावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१७१००९१५२८५४५४२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Jagdish Sajanikar

Digitally signed by Prashant Jagdish Sajanikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a8cd67058795ac5a961c2b41207cb6d24b79e17716af754c9fc40fd4145416f1, serialNumber=217003e42c820ec29c89162937f98929453cc6295b34f71ea285041053a66aa7, cn=Prashant Jagdish Sajanikar
Date: 2017.10.09 15:37:27 +05'30'

(प्रशांत साजणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
४) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व महासंचालक/कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.
१०) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई .
११) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
१२) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
१३) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
१४) संबंधीत अधिकारी. (कार्यालय प्रमुखामार्फत)
१५) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१६) उप सचिव (का.१३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१८) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.